दि. ०३.०८.२०२३

# प्रेस नोट

## ( आरोपी तलाठी केरबा शिंदे दुस–यांदा लातुर एसीबीच्या जाळयात )

आरोपी लोकसेवक केरबा गोविंदराव शिंदे वय ४८ वर्षे, पद तलाठी, वर्ग ३, नेमणुक पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर रा. चंद्रोदय कॉलनी, प्रकाश नगर लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून गुन्हा.

यातील आरोपी लोकसेवक केरबा गोविंदराव शिंदे, तलाठी यांनी तक्रारदार यांना त्यांची चुलत बहीणीच्या नावावर असलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र आजीचे शपथपत्राच्या आधारे तक्रारदार यांच्या बहीणीचे नावावरुन तक्रारदार यांच्या नावावर करण्यासाठी लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. ०२/०८/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. ०३/०८/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, वरील प्रमाणे प्राप्त तक्रारी नुसार तलाठी केरबा शिंदे यांनी तक्रारदार यांचे चुलत बहिणीच्या नावावर असलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र आजीच्या शपथपत्राच्या आधारे तक्रारदाराचे नावाने करून दिल्याचा मोबदला म्हणुन आरोपी शिंदे यांनी पंचासमक्ष तक्रारदारास सुरूवातीस ५,०००/– रू ची व तडजोडीअंती २,०००/–रू लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुंसार आज दि. ०३/०८/२०२३ रोजी तक्रारदार हे तक्रारदार हे आरोपी लोकसेवक शिंदे यांना लाचेची रक्कम २,०००/– रू देण्यासाठी पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे गेले असता आलोसे शिंदे यांनी पंचासमक्ष लाचेची रक्कम २,०००/– रू स्विकारली त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहाथ पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून लोकसेवक तलाठी केरबा शिंदे यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी, लातूर ता. जि. लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री. भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मपोकॉ/रूपाली भोसले पोकॉ/दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/MaharashtraACB |
| ८) | Twitter | :– | ACBlatur |
| ९) | Instagram | :– | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर
सत्यमेव जयते

Scanned with CamScanner